महाराष्ट्र जनशक्ती | ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार








छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ५४ वा | दिनांक : १९/११/२०२४ | वार : मंगळवार


## लॉरेन्सचा बिश्नोईचा भाऊ अनमोलला अटक



**नवी दिल्ली :** गँगस्टर लॉरेन्सचा भाऊ अनमोल याला अमेरिकेत अटक झाल्याची बातमी आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, त्याला कॅलिफोर्नियामध्ये अटक करण्यात आली आहे.

अनमोलवर सलमान खानच्या घरावर गोळीबार केल्याचा आरोप आहे. गायक सिद्धू मूसेवाला यांच्या हत्येप्रकरणीही अनमोलचे नाव पुढे आले होते.

दिल्ली आणि मुंबई पोलिसांनी अद्याप अटकेची पुष्टी केलेली नाही, परंतु गुप्तचर एजन्सीच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, अमेरिकेने दोन आठवड्यांपूर्वी अनमोल बिश्नोईविरोधात अजामीनपात्र वॉरंट जारी केले होते.

बॉलिवूड अभिनेता सलमान खानच्या घरावर गोळीबार करण्याची जबाबदारी अनमोलने घेतली होती. यासोबतच पंजाबी गायक सिद्धू मूसेवाला आणि बाबा सिद्दिकी यांच्या हत्या प्रकरणातही त्याचे नाव समोर आले आहे.

अलीकडेच, राष्ट्रीय तपास संस्थेने (एनआयए) गँगस्टर लॉरेन्सचा भाऊ अनमोल बिश्नोईवर १० लाख रुपयांचे बक्षीस ठेवले होते. एजन्सीने २०२२ मध्ये नोंदवलेल्या २ प्रकरणांमध्ये अनमोलविरुद्ध आरोपपत्र दाखल केले आहे. एनआयएच्या मोस्ट वाँटेड यादीतही अनमोलचे नाव आहे.

लॉरेन्स टोळीतील भानू म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अनमोलवर २०१२ मध्ये पंजाबमधील अबोहरमध्ये प्राणघातक हल्ला, मारहाण आणि शस्त्रास्त्र कायद्याच्या कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. २०१५ पर्यंत पंजाबमध्ये अनमोलवर ६ हून अधिक गुन्हे दाखल करण्यात आले होते. सध्या देशभरात अनमोलवर २२ गुन्हे दाखल आहेत. ज्यामध्ये खून, टार्गेट किलिंग, खंडणी, शस्त्रास्त्र कायद्यासह विविध कलमांचा समावेश आहे.

अनमोल बिश्नोई डान्स करताना दिसत आहे.

गॅलेक्सी अपार्टमेंटमध्ये गोळीबार केल्यानंतर लॉरेन्स गँग पुन्हा सलमान खानवर हल्ला करण्याची योजना आखत असल्याचे मुंबई पोलिसांच्या तपासात नुकतेच समोर आले आहे. या प्रकरणी १ जून रोजी नवी मुंबई पोलिसांनी लॉरेन्स टोळीतील चार जणांना अटक केली होती. या सर्वांचा पनवेलमध्ये सलमानच्या गाडीवर हल्ला करण्याचा कट होता.

त्यासाठी त्याने पाकिस्तानातून एके-४७सह अनेक शस्त्रे आयात करण्याची योजना आखली होती. तुर्की बनावटीच्या झिगाना पिस्तुलाने सलमानला मारण्याचाही लॉरेन्स टोळीचा डाव होता. पंजाबी गायक सिद्धू मूसेवाला यांचीही याच पिस्तुलाने हत्या करण्यात आली होती. गोरेगाव फिल्म सिटीसह सलमानच्या फार्म हाऊस आणि शूटिंगच्या अनेक ठिकाणांचीही रेकी करण्यात आली. वास्तविक, हे सर्व लॉरेन्स बिश्नोई टोळीच्या सोशल मीडिया ग्रुपशी संबंधित होते. याच गटातून सलमानला मारण्याची योजना आखली जात होती.

सलमान खानच्या वांद्रे येथील गॅलेक्सी अपार्टमेंटमध्ये गोळीबार झाला.

सलमान खानचे जवळचे सहकारी आणि राष्ट्रवादीचे नेते बाबा सिद्दिकी मुलगा झीशानच्या कार्यालयातून बाहेर पडले होते. त्यानंतर त्याच्यावर ६ गोळ्या झाडण्यात आल्या. सिद्दिकींच्या पोटात दोन आणि छातीवर दोन गोळ्या लागल्या. त्यांना तात्काळ लीलावती रुग्णालयात दाखल करण्यात आले, तेथे रात्री ११.२७ वाजता त्यांना मृत घोषित करण्यात आले. या हल्ल्याची जबाबदारी लॉरेन्स गँगने घेतली. १४ एप्रिल : सलमान खानच्या वांद्रे येथील गॅलेक्सी अपार्टमेंटमध्ये गोळीबार झाला. लॉरेन्स ग्रुपने या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली आहे. या घटनेच्या दोन महिन्यांनंतर सलमानने मुंबई पोलिसांना निवेदन दिले. तो म्हणाला होता, 'मी पुन्हा पुन्हा वेगवेगळ्या लोकांकडून टार्गेट होऊन कंटाळलो आहे. यापूर्वीही अनेकवेळा धमक्या आल्या असून दंडही ठोठावण्यात आला आहे. मी अनेक प्रकरणांमध्ये अडकलो आहे.

## 'सगळं सहन केलं...' संजना जाधव भर सभेत रडल्या



**कन्नड :** कन्नड विधानसभा मतदारसंघातील शिवसेना शिंदे गटाच्या उमेदवार संजना जाधव प्रचार सभेत भावुक झाल्याचे पाहायला मिळाले. संजना जाधव या केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांच्या कन्या आहेत. प्रचार सभेत बोलताना संजना जाधव यांनी पती हर्षवर्धन जाधव यांच्यावर गंभीर आरोप देखील केले. जाधव म्हणाल्या, 'हर्षवर्धन जाधव यांच्यासोबत लग्न झाल्यानंतर मी खूप काही सोसले. मी लग्न होऊन एका महिन्यात घरी आले. वडिलांना याबाबत सांगितले तर म्हणाले, तुला एक मूल होऊ दे, मूल झाल्यावर हा माणूस सुधारेल. मूल झाल्यावर माझे वडील म्हणाले, चाळिशी झाली की माणूस सुधरत असतो. चाळिशी झाली, जे सहन केले त्याचा मोबदला मला मिळाला नाही पण माझ्या जागेवर कोण आणले हे तुम्हाला माहिती आहे. हे बोलल्यावर संजना जाधव यांना स्टेजवरच रडू कोसळले. माझ्या वडिलांवर वाटेल ते आरोप लावण्यात आले. परंतु, आम्ही सगळे सहन केले. करण एका लेकीच्या बापाने ते सहन करायचे असते. मुलाचा बाप असता तर रस्त्यावर उतरला असता. मुलीचा बाप होता म्हणून ते शांत बसले, असेही संजना जाधव म्हणाल्या.

पुढे बोलताना त्या म्हणाल्या, 'आपले संस्कारच आहेत, आई म्हणाली होती, आता तू घरून जात आहे. तू परत येशील तेव्हा तिरडीच आली पाहिजे, तू एकटी नाही आली पाहिजे, असे मला आईने सांगितले होते. हे सांगताना संजना जाधव यांचा कंठ दाटून आल्याचे पाहायला मिळाले.आईने सांगितल्याप्रमाणे मी संसार केला. पण मला काय मिळाले. मी आत्तापर्यंत कधीच रडले नाही. कधीच कुठल्या गोष्टीची वाच्यता केली नाही, हे गांव माझे म्हणून भरून आले. मी काय केले आणि काय केले नाही हे सगळ्यांना माहीत आहे, असे संजना जाधव म्हणाल्या. त्यांच्या भाषणाचा व्हिडिओ सध्या चांगलाच व्हायरल होत आहे.

## सुरक्षित वाटत नसेल तर पंतप्रधान मोदींनी राजीनामा द्यावा

**मुंबई :** येथील बीकेसी मैदानात शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांची सभा पार पडली. यावेळी बोलताना त्यांनी महायुती सरकारवर टीका केली. मुंबई ही स्वायत्त आहेच, महाराष्ट्राची राजधानी आहे. या मुंबईला तोडण्याची भाषा केली जात आहे.मुंबईला महाराष्ट्रापासून तोडण्याचा विचार जरी केला तरी देहाचे तुकडे केल्याशिवाय राहणार नाही. म्हणून मग आता दिल्लीच्या नीती आयोगाकडून मुंबईची ब्ल्यु प्रिंट बनवण्याचा प्रयत्न हे सरकार करत आहे.उद्धव ठाकरे पुढे म्हणाले, तिकडे पंतप्रधान मोदी असूनही जर यांना सुरक्षित वाटत नसेल तर मोदींनी राजीनामा द्यावा आणि शिवसेनेत घेणार नाही पण शिवसेना काम कसे करते ते बघायला या, असे उद्धव ठाकरे म्हणाले.कटेंगे बटेंगेच्या घोषणेवर उद्धव ठाकरे यांनी भाजप महायुतीवर टीका केली. मी मुख्यमंत्री असताना असल्या घोषणा नव्हत्या, असेही उद्धव ठाकरे म्हणाले. आपले हिंदुत्व चूल पेटवणारे आणि त्यांचे हिंदुत्व हे घर पेटवणारे असल्याची देखील टीका उद्धव ठाकरेंनी केली.संपूर्ण मुंबई हे अदानीच्या घशात घालत आहेत. फक्त मुंबईच नव्हे तर मुंबईच्या आसपासचा परिसर देखील अदानीला देण्याचा घाट घालण्यात आला आहे.केवळ धारावी नाही तर संपूर्ण महाराष्ट्र या अदानीच्या घशात घालण्याचा हा घाट घातला जात असल्याचा आरोप उद्धव ठाकरे यांनी केला आहे. माझे सरकार आल्यावर अदानीला देण्यात आलेले सर्व प्रकल्प मी काढून घेणार आहे, असेही ते म्हणाले.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १९ नोव्हेंबर २०२४

## तालुक्यातील चिंचखेडा (खुर्द) येथे काकडा आरतीची दिंडीने सांगता



**कन्नड (अक्षय चव्हाण) :** कार्तिक मास निमित्ताने तालुक्यातील चिंचखेडा (खुर्द) येथील हनुमंतरायाच्या व पाडुरंगाच्या मंदिरात एक महिन्यापासून सुरू असलेल्या काकडा आरती भजनाची सांगता दिंडी प्रदर्शनाने (दि.१५) शुक्रवारी झाली. गावात दिंडी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. पहाटे चार वाजेपासून भजनी मंडळींनी संपूर्ण गावातून दिंडी प्रदक्षिणा काढली. यावेळी गावातील महिलांनी देखील दिंडीच्या स्वागतासाठी आपल्या घरासमोर अंगणात सडा, रांगोळी काढुन या दिंडीचे स्वागत केले. गावातील अनेक महिला, मुलींनी डोक्यावर तुळशी वृंदावन घेऊन दिंडी प्रदक्षिणात मोठ्या उत्साहाने सहभागी झाल्या होत्या.

यावेळी सुरेश महाराज आढाव, तोताराम घुले, वाल्मीक घुले, तुकाराम कदम, अशोक घुले, कृष्णा आढाव, दत्तात्रय आढाव, अप्पा घुले, प्रतिभा साठे, सविता कदम अरुण घुले, दादासाहेब घुले, ज्ञानेश्वर घुले आदिसह भजनी मंडळासह गावातील नागरिक दिंडीत सहभागी झाले होते.

## भाजपचे आमदार व्यापाऱ्यांना धमकावतात : प्रदीप जैन



**पुणे :** काँग्रेसने नेहमी व्यापाऱ्यांचा सन्मान केला आहे. काँग्रेसने व्यापाऱ्याचे विकेंद्रीकरण केले. मात्र भाजप सरकारने व्यापाऱ्याचे केंद्रीकरण केले आहे. भाजपने व्यापाऱ्यांना आर्थिक आंतकवादाच्या स्थितीत आणले आहे. व्यापाऱ्यांना घाबरवले जात आहे. देशातील छोटे व्यापारी सुरक्षित नाहीत. जीएसटीमुळे व्यापारी भरडला जात आहे, अशी टीका काँग्रेसचे माजी केंद्रीय मंत्री प्रदीप जैन यांनी केली. भाजपच्या काळात पुण्याची दुर्दशा झाली आहे. भाजपचे आमदार व्यापाऱ्यांना धमकावतात, अशीही टीका त्यांनी केली.

महाविकास आघाडीचे पुणे कँटोन्मेंट विधानसभा मतदारसंघातील उमेदवार रमेश बागवे, कसबा पेठ विधानसभा मतदारसंघातील उमेदवार रवींद्र धंगेकर आणि पर्वती विधानसभा मतदारसंघातील उमेदवार अश्विनी कदम यांच्या प्रचारार्थ आयोजित व्यापारी मेळाव्यात ते बोलत होते. काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस ॲड. अभय छाजेड, पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या व्यापारी सेलचे अध्यक्ष भरत सुराणा, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या व्यापारी आघाडीचे अध्यक्ष सरदार भोलासिंग अरोरा, पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या ग्राहक संरक्षक सेलचे अध्यक्ष अरुण कटारिया आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची व्यापारी आघाडी यांच्यातर्फे गुलटेकडी येथील महावीर प्रतिष्ठानमधील पारख सभागृहात या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. उत्तराखंडचे विरोधी पक्षनेते टी. एस. सिंगदेव, ज्येष्ठ व्यापारी देवीचंद भन्साळी, विजयकांत कोठारी, वालचंद संचेती, डॉ. जितेंद्र जैन, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रभारी शहराध्यक्ष अंकुश काकडे, काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे व सचिन सावंत, राष्ट्रीय मजदूर संघाचे अध्यक्ष सुनील शिंदे, गौरव जैन आणि नितीन कदम उपस्थित होते.

काँग्रेसने जैन समाजाला अल्पसंख्याक दर्जा दिला. माजी मंत्री प्रतीक पाटील आणि अभय छाजेड यांनी यासाठी महत्त्वाचे काम केले आहे. जैन समाज संख्येमुळे नाही, तर गुणवत्तेमुळे ओळखला जातो. देश स्वतंत्र झाल्यानंतर पहिले पंतप्रधान पं. नेहरू यांनी व्यापाराचे विकेंद्रीकरणाचे केले. देशात छोटे-छोटे उद्योग विकसित व्हावेत, यासाठी त्यांनी व्यापारपूरक धोरण अवलंबले, असे जैन यांनी सांगितले. भाजपने व्यापाराचे केंद्रीकरण केले आहे. चुकीच्या जीएसटी धोरणामुळे व्यापारी भरडला जात असून, काही व्यापाऱ्यांनी आत्महत्या केली आहे, अशी टीका त्यांनी केली.

सिंगदेव म्हणाले, व्यापाऱ्यांनी व्यवसाय वाढवून समाजासाठी काम केले पाहिजे. त्यासाठी सरकारने व्यवसायपूरक धोरण राबविले पाहिजे. सरकारकडे करातून पैसा येणार नाही तोपर्यंत सरकार विकास धोरण राबवू शकत नाही. मात्र कररचना संतुलित पाहिजे. जीएसटीमुळे व्यापारी अडचणीत आला आहे.

## पुढील निवडणुकीत मी असेन किंवा नसेन: एकनाथ खडसे



**जळगाव :** विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराच्या अखेरच्या दिवशी माजी मंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते एकनाथ खडसे यांनी यापुढे कोणतीही निवडणूक लढवणार नसल्याची घोषणा केली आहे. मी यापुढे कोणतीही निवडणूक लढवणार नाही. कदाचित पुढील निवडणुकीत मी असेन किंवा नसेन. हे ईश्वरच ठरवेन, पण मला सांभाळले तसे माझी मुलगी रोहिणी खडसे यांना सांभाळा, असे त्यांनी मतदारांना उद्देशून म्हटले आहे.

राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाने एकनाथ खडसे यांच्या कन्या रोहिणी खडसे यांना मुक्ताईनगर विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी दिली आहे. त्यांचा सामना शिवसेना शिंदे गटाच्या चंद्रकांत निंबा पाटील यांच्याशी होईल. या पार्श्वभूमीवर एकनाथ खडसे यांनी सोमवारी मतदारांना आपल्या मुलीच्या पाठिशी उभे राहण्याचे आवाहन केले आहे.

एकनाथ खडसे सोमवारी एका व्हिडिओद्वारे म्हणाले की, मी गेली अनेक वर्षांपासून आपल्यासोबत आहे. अनेक वर्षे तुम्ही मला सहकार्य केले. मला आशीर्वाद दिले. मी ही तुमच्या सुख दु:खात सहभागी झालो. कोणतीही जात-धर्म न पाळता मी सर्वांना मदत करण्याची भूमिका पार पाडली.

पण आता माझी तब्येत ठीक नसते. त्यामुळे पुढील निवडणूक मी पाहणार किंवा नाही हे आता ईश्वरच ठरवेल. पुढील निवडणुकीत कदाचित मी असेन किंवा नसेनही. पण या निवडणुकीत मी आपल्याला विनंती करणार आहे की, आपण सर्वांनी रोहिणी खडसे यांना निवडून द्यावे. आपण मला सहकार्य केले तसे रोहिणी यांनाही करावे, असे खडसे मतदारांना आपल्या मुलीमागे उभे राहण्याचे आवाहन करताना म्हणालेत.

## महाराष्ट्रात हरियाणाहून चांगले खेळाडू : पण त्यांना प्रोत्साहन मिळत नाही- विनेश फोगाट



**पुणे :** महाराष्ट्रात हरियाणाहून चांगले खेळाडू आहेत. परंतु, त्यांना सरकारकडून प्रोत्साहन मिळत नाही. ऑलिम्पिकमध्ये पदक मिळवून देशाचा गौरव वाढविणाऱ्या खेळाडूंना कसल्याही सोयी-सुविधा हे सरकार देत नाही. खेळाडूंसाठी चांगली मैदानेही नाहीत. खेळाडूंच्या विकासासाठी खेळाच्या मैदानात आम्हा खेळाडूंना आशीर्वाद देता तसा महाराष्ट्राच्या विकासासाठी महाविकास आघाडीच्या उमेदवारांना मतांमधून आशीर्वाद द्या, असे आवाहन हरियाणातील काँग्रेसच्या आमदार आणि प्रसिद्ध कुस्तीपटू विनेश फोगट यांनी सोमवारी केले.

महाविकास आघाडी आणि इंडिया फ्रंटचे कँटोन्मेंट विधानसभा मतदारसंघातील उमेदवार रमेश बागवे, कसबा पेठ विधानसभा मतदारसंघातील उमेदवार रवींद्र धंगेकर, पर्वती विधानसभा मतादरसंघातील उमेदवार अश्विनी कदम, हडपसर विधानसभा मतदारसंघातील उमेदवार प्रशांत जगताप, शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघातील उमेदवार दत्ता बहिरट, कोथरूड विधानसभा मतदारसंघातील उमेदवार चंद्रकांत मोकाटे, वडगावशेरी विधानसभा मतदारसंघातील बापू पठारे आणि खडकवासला विधानसभा मतदारसंघातील उमेदवार सचिन दोडके यांच्या प्रचारार्थ विनेश फोगट यांच्या उपस्थितीत खेळाडू मेळाव्याचे काँग्रेस भवन येथे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी विनेश फोगट यांना गदा देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी काँग्रेसचे शहराध्यक्ष अरविंद शिंदे, माजी आमदार दीप्ती चवधरी, महिला काँग्रेसच्या प्रभारी शहराध्यक्ष संगीता तिवारी, शिक्षण मंडळाचे माजी अध्यक्ष विजय शिंदे, रफीक शेख, काँग्रेसच्या राष्ट्रीय प्रवक्त्या शमा महंमद तसेच मेळाव्याचे आयोजक काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस ॲड. अभय छाजेड, शहर काँग्रेसच्या क्रीडा सेलचे अध्यक्ष आशुतोष शिंदे, उपाध्यक्ष लतेंद्र भिंगारे, ओम भवर आदी उपस्थित होते.

राजकारणात येईन, असे मला कधी वाटले नव्हते. मी आता राजकारणात असले तरी आधी खेळाडू आहे. आता राजकारणातील जबाबदारी वाढली आहे. मैदानावर संघर्ष केल्यानंतर महिलांच्या शोषणाविरोधात रस्त्यावर संघर्ष करावा लागला. क्रीडा क्षेत्रात येऊ इच्छिणाऱ्या तरुणींना हा त्रास होऊ नये, यासाठी मी संघर्ष करायला तयार आहे. खेळाडूंना चांगल्या दर्जाच्या सोयी-सुविधा मिळाव्या तसेच चांगल्या वातावरणात त्यांना आपला खेळ वाढवता यावा यासाठी मी खेळाडूंबरोबर कायम मैदानात उभी असेन. चांगले शिक्षण आणि प्रशिक्षण दिले तर आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू देशात घडतील, अशी भावना फोगट यांनी व्यक्त केली. भाजपने महाविकास आघाडी सरकार पाडले. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे व राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष हे दोन पक्ष फोडले. या महायुतीला धडा शिकवण्याती वेळ आली आहे. मतदानात मोठी ताकद असते. ही ताकद महायुतीला दाखविण्याची वेळ आली आहे, अशी टीका त्यांनी केली.

उज्ज्वल भविष्यासाठी महाविकास आघाडीला मतदान करा,असे आवाहन त्यांनी केले. महाविकास आघाडी सरकार येताच प्रत्येक शहरात चांगली मैदाने बांधण्यात येतील, असे आश्वासन त्यांनी दिले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १९ नोव्हेंबर २०२४


## बारामतीतील अखेरच्या सभेत अजित पवार भावूक:



**बारामती :** बारामती विधानसभा मंतदारसंघाच्या निवडणुकीच्या सांगता सभेत अजित पवारांनी भाषण करताना अनेक विषयांना हात घातला आहे. आजचा दिवस हा माझ्या आयुष्यातील सर्वात महत्त्वाचा आहे. तसेच बारामतीकरांशी संवाद साधतान अजित पवार यावेळी भावूक झाल्याचेही पाहायला मिळाले. महायुतीचा अधिकृत उमेदवार या नात्याने मी बारामतीकरांच्या सदिच्छा घ्यायला आलो आहे. तुम्ही मला ७ वेळा निवडून दिले आता आठव्यांदा निवडून द्या, असे आवाहन अजित पवारांनी केले आहे.

अजित पवार सभेत बोलताना म्हणाले, आपल्या सगळ्यांना विश्वास आहे की मागच्या विधानसभा निवडणुकीत तुम्ही मला प्रचंड बहुमताने निवडून दिले. तेव्हाच मी ठरवले की बारामतीकरांना सर्वात जास्त निधी मिळवून द्यायचा. माझ्या मनात अनेक संमिश्र अशा भावना आहेत. १९९१ साली मला निवडणुकीत जरा भीती वाटली होती. तेव्हा राज्यात राणे आणि गोपीनाथ मुंडे यांचे सरकार होते. त्यावेळेस सर्वपक्षीय उमेदवार आदरणीय चंद्राव अण्णा उभे होते. तेव्हा अगदी एकास एक अशी लढत झाली. तेव्हा मी जरा घाबरलो, मात्र बारामतीकरांनी मला ५० हजार मताधिक्याने निवडून दिले.

अजित पवार म्हणाले, अनेक प्रकारच्या गोष्टी करताना मी एकच गोष्ट लक्षात ठेवली होती की बारामतीकराच्या कोणत्याही व्यक्तीच्या मदतीला आपण कमी नाही पडलो पाहिजे. हा तालुका प्रत्येकाला हवाहवासा वाटवा, या ठिकाणी निवृत्तीनंतरचे आयुष्य जगावे, इथे सुरक्षित आहे, इथे कायदा सुव्यवस्था चांगली आहे, इथे दंगली घडल्या नाहीत. मी सगळ्यांना सोबत घेऊन पुढे जातो. हेच मी सतत डोळ्यासमोर ठेऊन काम करत आलो आहे.

पुढे बोलताना अजित पवार म्हणाले, माझ्यावर एकट्यावर बारामतीची जबाबदारी नाही, माझ्याकडे पक्षाची जबाबदारी आहे. महायुतीमधला घटक म्हणून जबाबदारी आहे, महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री पदाची जबाबदारी आहे. जनसन्मान यात्रेच्या निमित्त मी संपूर्ण महाराष्ट्र फिरलो आहे. महायुतीने आणलेल्या योजना सगळ्यांपर्यंत पोहोचवण्याचे काम केले. मुलींचे शिक्षण मोफत केले, लाडकी बहीण योजना आणली. शिव शाहू फुले आंबेडकरांचे विचार घेऊन आम्ही पुढे जात आहोत.

एकदा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे मला म्हणाले, मला खूप वाईट वाटत आहे. मी त्यांना विचारले काय झाले, तेव्हा त्यांनी सांगितले की आपण मुलींच्या शिक्षणाची अर्धी फीस देत आहोत. पण मला एका मुलीचे पालक भेटले, त्यांनी मला सांगितले की तुम्ही अर्धी फी भरता पण उरलेली अर्धी फी भरायला देखील आमच्याकडे पैसे नाहीत. आमच्या मुलीला मेडिकलचे शिक्षण घ्यायचे होते मात्र पैसे नसल्याने तिने आत्महत्या केली. आपण फुले शाहू आंबेडकरांचे विचार घेऊन जात असताना राज्याची जबाबदारी आपल्याकडे असताना आपल्यामुळे कोणी आत्महत्या करू नये असे मला वाटते. मला अर्थसंकल्प ठरवायचा होता. मी माझे फायनान्सच्या लोकांना विचारले अर्धी फी साठी आपले किती पैसे जातात त्यांनी सांगितले की साडे तीन हजार कोटी रुपये जातात. मी म्हणालो अजून साडे तीन हजार कोटी जाऊ द्या, पण शिक्षणापासून वंचित राहून कोणी आयुष्य संपवू नये, असा एक किस्सा अजित पवारांनी यावेळी सांगितला.

टेक्स्टाईल पार्कमधील प्रतिभा पवार यांच्याबाबत घडलेल्या प्रकारावरही अजित पवारांनी भाष्य केले. अजित पवार म्हणाले, त्याची पूर्ण माहिती घेऊन बोलले पाहिजे. त्याचे राजकारण केले नाही पाहिजे. तसेच लोकसभा निवडणुकीची आठवण काढताना अजित पवार म्हणाले, मी मागे एकटा पडलो होतो, यावेळी माझी आई माझ्यासोबत आहे. माझ्या बहिणी माझ्यासाठी फिरत आहेत. माझ्या पोटच्या पोरांनी तर माझ्यासाठी फिरलेच पाहिजे. माझी बायकोही फिरतेय, तिने तर माझ्यासोबत असलेच पाहिजे. कारण, लोकसभा निवडणुकीत पराभव झाल्यानंतरही त्यांना राज्यसभा दिलीय, असा भावनिक आणि मिश्कील टोलाही अजित पवारांनी लगावला.

दरम्यान, आपल्या ग्रामीण भागात बस स्थानक चांगले आहे, इतकं भोरच वाईट आहे. महिलांना विकास दाखवल्यावर एक महिला म्हणाली बाई मला माहीतच नव्हते. काम करण्याची हिंमत आणि धमक आपल्यात आहे. अजून काही करायचे बाकी आहे, त्यासाठी तुम्हाला २० तारखेला घड्याळाचे बटन दाबावे लागेल. घड्याळाचा बटन दाबले की तुमचे काम झाले, असे आवाहन अजित पवारांनी यावेळी केले आहे.

## मी मुख्यमंत्री नाही, पाच मिनिटांसाठी का होईना देशाचा पंतप्रधान बनेन



**भूम :** राष्ट्रीय समाज पक्षाचे अध्यक्ष महादेव जानकर यांनी मुख्यमंत्रीपदाबाबत मोठा दावा केला आहे. मी आयुष्यात मुख्यमंत्री होणार नाही. मात्र, पाच मिनिटांसाठी का होईना देशाचा पंतप्रधान झाल्याशिवाय राहणार नाही, असे महादेव जानकर म्हणाले. भाजप आणि काँग्रेस हे गद्दार पक्ष आहेत, अशी टीका त्यांनी केली. निवडणुकीच्या तोंडावरच शिंदेंना लाडक्या बहिणींची कशी आठवण झाली? आधी पाच वर्ष कुठे होतात? तेव्हा कुठे गुवाहाटीला गेला होतात का? असा टोलाही जानकर यांनी मुख्यमंत्र्यांना लगावला.

राष्ट्रीय समाज पक्षाचे उमेदवार राहुल घुले यांच्या प्रचारार्थ धाराशीव जिल्ह्यातील भूम शहरात रासपचे राष्ट्रीय अध्यक्ष महादेव जानकर यांची जाहीर सभा झाली. या सभेत बोलताना जानकर यांनी भाजप, काँग्रेससह मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावरही जोरदार निशाणा साधला. तसेच मी पाच मिनिटांसाठी का होईना, पण देशाचा पंतप्रधान झाल्याशिवाय राहणार नाही, असा दावाही त्यांनी केला. त्यांच्या या दाव्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

आज सांगतात आम्ही पाणी दिले, वीज दिली, विमा दिला. लाडक्या बहिणींना पैसे दिले. पण हे पैसे त्यांचे आहेत का? ते पैसे त्यांचे नाहीत, तर जनतेचे आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवडणुकीच्या तोंडावरच लाडक्या बहिणींची कशी आठवण झाली? आधी पाच वर्ष कुठे होतात? तेव्हा कुठे गुवाहाटीला गेला होतात का? असा खोचक टोला महादेव जानकर यांनी लगावला.

पुढे बोलताना जानकर यांनी भाजपवर जोरदार हल्लाबोल केला. आज आपण पाहिले तर भाजपा गद्दार पक्ष आहे आणि काँग्रेसही देखील चांगली नाही. त्यांच्यामुळे तुमचे वाटोळे होत आहे. भारतीय जनता पक्ष माणसात माणूस आणि पक्षात पक्ष ठेवत नाही. शरद पवारांनी पक्ष काढला तर त्यांच्या घरात फोडाफोड केली, अशी टीका महादेव जानकर यांनी केली.

ही संधी गमाऊ नका, अशी कळकळीची विनंती महादेव जानकर यांनी जनतेला केली. या निवडणुकीत राष्ट्रीय समाज पक्ष नक्की खाते खोलणार असून आपले आमदार निवडून येणार आहेत, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला. आपले आमदार निवडून आल्यानंतर तुमचा राज्यात पहिला मान असणार आहे. कारण तुम्ही मला एक नंबरचे मतदान एक दिले होते. तुमच्यामुळे मला मान्यता मिळाली, असे मत जानकर यांनी व्यक्त केले.

महादेव जानकर म्हणाले, आज देशभर जे बोलतो ते भूम परांड्याच्या जनतेच्या जोरावर बोलतो. जेव्हा माझा झेंडा घ्यायला कोणी नव्हते, तेव्हा तुम्ही मला मतदान दिले होते. त्यामुळे एवढ्या वेळी तुम्ही मला संधी द्या. मी मुख्यमंत्री कधीच होणार नाही. पण पंतप्रधान झाल्यानंतर भूम परांड्यातून हेलिकॉप्टर घेऊन नक्की फिरेल. ते देखील झेंडा आणि चिन्हही माझे असेल, असे महादेव जानकर म्हणाले.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002